# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University



सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in  संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in  विस्तारीत क्रमांक : १३०

◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉


जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/
Ref. No. : PAHSU/BOEE/ 518

दिनांक :
Date : 11 MAY 2021

## परिपत्रक 23

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाचे संचालक यांना कळविणेत येते की, ब-याच वेळा प्रस्तुत विद्यापीठाच्या असे निर्दशनास आले आहे कि, विद्यार्थी ज्यावेळी एकादी अडचण घेऊन शिकत असलेल्या महाविद्यालयात जातो, त्यावेळी सदरील विद्यार्थ्यांच्या शंकेचे निरसन करण्याऐवजी अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडे पाठवून दिले जाते. संबंधित विद्यार्थी प्रस्तुत विद्यापीठात येऊन अडचण सांगून मला महाविद्यालयामध्ये विद्यापीठात जा, असे सांगितल्याचे कथन विद्यार्थी विद्यापीठात येऊन करतो. ही बाब खूप गंभीर स्वरुपाची असून विद्यार्थ्यांना महाविद्यालय स्तरावर मदत केली जात नसल्याचे स्पष्ट होत आहे. महाविद्यालयाच्या अशा सांगण्यामुळे नाहकपणे विद्यापीठ प्रशासनावर व विद्यार्थ्यावर ताण पडत आहे.

त्यामुळे आपणास कळविणेत येते की, जे विद्यार्थी आपल्या महाविद्यालयात शिकत आहेत, अशा विद्यार्थ्यांची अडचण समजून घेऊन त्याचे शंकेचे निरसन आपल्या स्तरावर करता येईल का ? याबाबतची खात्री करुन तशी मदत विद्यार्थ्यांना करावी. अन्यथा सदर अडचण विद्यापीठ स्तरावरील असल्यास अडचणीच्या संदर्भात सर्व वस्तुस्थिती स्वयंस्पष्टपणे आपल्या महाविद्यालयाच्या पत्रामध्ये नमूद करुन त्यासंबंधी योग्य त्या अभिलेखासह सदर प्रकरण प्रस्तुत विद्यापीठाकडे पाठवून दयावे.

वर नमूद केल्याप्रमाणे अशी प्राप्त झालेल्या प्रकरणाची प्रस्तुत विद्यापीठ स्तरावरुन पडताळणी करुन विद्यार्थ्यांच्या शंकेचे निरसन करण्याची यथोचित प्रक्रिया पुर्ण करुन त्याबाबत आपल्या महाविद्यालयास कळविणेत येईल. कोणताही विद्यार्थी प्रस्तुत विद्यापीठाकडे येणार नाही, याबद्दलची दक्षता आपण घ्यावी. मोठया संख्येने विद्यार्थी विद्यापीठाकडे येत असल्यामुळे प्रशासकीय कामे बाजूला ठेऊन विद्यार्थ्यांना मदत करावी लागते.

सबब, येथून पुढे आपल्या महाविद्यालयातील कोणताही विद्यार्थी त्याची अडचण घेऊन निरसन करणेसाठी विद्यापीठात येणार नाही, याबाबत आपण वैयक्तिकरित्या लक्ष घालून प्रस्तुत विद्यापीठ प्रशासनास सहकार्य करावे.

( डॉ. विकास कदम )
प्र संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,

प्राचार्य, प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयाचे / विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाचे संचालक
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर